**आदेश**

जा.क्र. पोआ/८४७५/२०१९
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय, दि :-३०.११.२०१९

**विषय :- फौजदारी प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश...**

लोहगांव टेक्नीकल विमानतळ व नागरी विमानतळ पुणे शहर येथे दिवसा व रात्री वेगवेगळया एअरलाईन्सची, भारतीय वायु सेनेचे विमाने व हेलीकॉप्टर उतरत असतात व उड्डान करत असतात रात्रीच्या वेळी वैमानीकांना दिशा व ठिकाण दाखवण्यासाठी रनवे वर व एटीसी टॉवर कडून संकेतासाठी लाईटचा उपयोग करण्यात येतो.

भारतीय वायुसेनानी असे निदर्शनास आणुन दिले आहे कि लोहगांव विमानतळाचे वायुक्षेत्र (एअर फिल्ड) जवळच्या परिसरात विविध कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर प्रकाश बिंम (लाईट बीम) चा उपयोग करण्यात येतो.

माझी अशी खात्री पटली आहे की, अशा प्रखर लाईट बीम मुळे वैमानीकांचे डोळे दिपुन दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

त्याअर्थी उपरोक्त परिस्थितीमध्ये मी **संदीप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१) प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी असा आदेश देतो की,

लोहगांव वायुसेना व नागरी विमान तळाच्या साधारणपणे १५ किलोमीटर अंतराच्या वायु क्षेत्र (एअर फिल्ड) परिघामध्ये (**Radius**) पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १८.०० ते ०६.०० वाजेपर्यंत खालील कृत्यांवर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही माणसाने किंवा कार्यक्रम आयोजकांनी प्रखर लाईट बीम आकाशात सोडू नये सदरचा आदेश दिनांक ३० .११.२०१९ रोजी पासुन दोन महिन्यासाठी अमलात राहील.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

**सदरचा आदेश मी माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक३०.११.२०१९ रोजी दिला आहे.**

अपर पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

**(संदीप बिष्णोई)**
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण** :- पिंपरी चिंचवड
**दिनांक** :-३० .११.२०१९